24 MAR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात आयोजित कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. रघुनाथ ढमकले, प्रकाश कांबळे, चेतना सोनकांबळे यांच्यासह शिक्षक, संशोधक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# अनुवादातून सर्जनशील नवनिर्मिती : डॉ. ढमकले

कोल्हापूर, ता. २३ : 'ज्ञानाच्या संक्रमणामध्ये अनुवादित साहित्य महत्त्वाची भूमिका बजावते. भाषांतर ही केवळ कला नसून, ती सर्जनशील नवनिर्मिती असते. अनुवाद प्रक्रियेमुळेच सामान्य माणसापर्यंत ज्ञान पोहोचू शकते', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी आज केले.

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात 'अध्ययन साहित्याचे भाषांतर' या विषयावर दोनदिवसीय कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात झाले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांबळे होते.

डॉ. कांबळे म्हणाले, 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय ज्ञानाच्या प्रसाराला महत्त्व देण्यात आले आहे. त्याचे योग्य उपयोजन करण्यासाठी अध्ययन साहित्य स्थानिक भाषेमध्ये उपलब्ध होणे गरजेचे आहे.'

शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी कार्यशाळेचे प्रयोजन स्पष्ट केले. बन्सी होवाळे, आरती पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रतीक्षा माने, दर्शना डोकरमारे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAR 2025
पुढारी

# विद्यापीठात आजपासून मत्स्योत्पादन उद्योजकता विकासाबाबत मार्गदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे दि. २४ते २७मार्च या कालावधीत 'मत्स्योत्पादन आणि मत्स्यपालन' या विषयावरील मूल्यवर्धित उद्योजकता विकास अभ्यासक्रम उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पीएम-उषा सॉफ्ट स्कील विकास कार्यक्रमांतर्गत दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या रत्नागिरी येथील मत्स्य महाविद्यालयाच्या सहकायनि हा उपक्रम होत आहे. अशी माहिती समन्वयक तथा प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. एस.आर. यन्कंची यांनी दिली.

दि. २४ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन समारंभ होणार आहे.

मत्स्य महाविद्यालयाच्या मत्स्योत्पादन अभियांत्रिकी विभाचे प्रमुख डॉ. बी. आर. चव्हाण हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असतील. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व डॉ. सरिता ठकार आणि डॉ. सागर डेळेकर प्रमुख उपस्थित असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAR 2025
पुढारी

# योग निसर्गोपचार कौशल्य व उद्योजकता विकास मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने योग निसर्गोपचार क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.

योग निसर्गोपचार ही काळाची गरज असून, याच्या माध्यमातून आरोग्य व सकारात्मक जीवनशैली साधता येते, असे डॉ. पाटील यांनी सांगितले.

डॉ. रामचंद्र पवार यांनी विद्यार्थ्यांना नवीन कौशल्य आत्मसात करून स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा सल्ला दिला. कार्यशाळेचे समन्वयक अरविंद पालके यांनी योग निसर्गोपचार क्षेत्राची व्याप्ती स्पष्ट केली. डॉ. प्रकाश राऊत यांनी स्टार्टअप व उद्योजकता संधी, गणेश गोडसे यांनी योग निसर्गोपचार उद्योजकांसाठी बँकिंग प्रणालीसंदर्भात तर संजय शिंदे यांनी यशस्वी निसर्गोपचार व्यवसायाचा प्रत्यक्ष अनुभव या विषयांवर मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAR 2025

लोकमत

# योग निसर्गोपचार कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने योग निसर्गोपचार क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा नीलांबरी सभागृहात उत्साहात पार पडली. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी कार्यशाळेचे आयोजक डॉ. रामचंद्र पवार, अरविंद पालके, डॉ. प्रकाश राऊत, विक्रम रेपे यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAR 2025
सकाळ

# शाहू महाविद्यालयात चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २३ : राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे 'विकसित भारत@२०४७ : सर्वसमावेशक व शाश्वत विकासासाठी व्यूहरचना' यावर एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र झाले.

प्रभारी प्राचार्य डॉ. डी. आर. भोसले, विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे डॉ. पी. एस. कांबळे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. एच. व्ही. संकपाळ पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी होते. एस. बी. घाटगे यांनी आभार मानले. दुसऱ्या सत्रात डॉ. एस. टी. बिरनाळे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. के. एन. मुल्ला यांनी आभार मानले. समारोपप्रसंगी प्रा. डॉ. आर. ए. वाईंगडे उपस्थित होते. डॉ. भोसले या सत्राचे अध्यक्ष होते. उपप्राचार्य पी. एस. चौगुले, डॉ. एम. के. कन्नाडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ. यु. एस.शेळके आदी उपस्थित होते. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या सरोज पाटील (माई), महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष संगीता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. बी. देसाई यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सविता माजगावकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एस. बनसोडे यांनी आभार मानले.